# 'यूजीसी' आणि 'एआयसीटीई'च्या रचनेत मोठे बदल

## मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांची घोषणा

**प्रतिनिधी, पुणे**

**विद्यापीठ अनुदान** आयोग (यूजीसी), अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) आणि राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एनसीटीई) अशा शिक्षण व्यवस्थेतील तीन महत्त्वाच्या नियामक संस्थांमध्ये केंद्र सरकार मोठे बदल करणार आहे. या संस्थांशी संबंधित सर्व क्लिष्ट प्रक्रिया सोप्या करून त्यांची कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढविण्यावर भर देण्यात येईल. देशातील गुणवत्ताधारित शिक्षण संस्थांना अधिक स्वायत्तता देण्याबरोबरच संशोधनाला प्रोत्साहन देण्याचे सरकारचे धोरण आहे, असे मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी सोमवारी सांगितले.

गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्थेच्या २४ व्या पदवीप्रदान कार्यक्रमात जावडेकर बोलत होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. संस्थेचे कुलपती आणि नीती आयोगाचे अध्यक्ष डॉ. राजीव कुमार, संस्थेचे प्रभारी संचालक डॉ. राजस परचुरे या वेळी उपस्थित होते.

जावडेकर म्हणाले, नियामक संस्था या त्यांच्याशी संलग्न असलेल्या संस्थांना सहकार्य करणाऱ्या असाव्यात, असे सरकारचे धोरण आहे. त्यासाठीच या नियामक संस्थांच्या कार्यपद्धतीत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. या संस्थांचा कारभार अधिक पारदर्शक आणि गतिमान करून वेळेची बचत करण्यावर सरकारने भर दिला आहे.

देशातील गरिबांना त्यांच्या गरिबीतून मुक्त करणे हेच ध्येय विद्यार्थ्यांनी ठेवले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून जावडेकर म्हणाले, जगाची अर्थव्यवस्था वेगाने बदलत आहे. त्यामुळे संधींबरोबरच काही आव्हानेही समोर उभी ठाकली आहेत. त्यावर मात करण्यासाठी तुम्ही सज्ज असले पाहिजे. भारतावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांनी त्यांच्या हाताखाली काम करणारे कारकून तयार करणारे शिक्षण दिले. प्रत्येकापर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे, हा त्यांचा उद्देश नव्हता. मात्र, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक यांच्यासारख्यांनी राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्था उभ्या केल्या. देशाला राजकीय स्वातंत्र्य तर मिळेलच, पण त्यानंतर काय, या विचारातून या संस्था उभ्या राहिल्या.

अन्य देशांच्या तुलनेत भारत संशोधनात मागे आहे. संशोधनाखेरीज प्रगती अशक्य आहे. त्यातूनच पैसे व समृद्धी तर येतेच, पण जीवनमान उंचावते. त्यासाठीच 'एटीएम'च्या धर्तीवर 'एनी व्हेअर लर्निंग'ची सुविधा ऑनलाइन-ऑफलाइन माध्यमातून उपलब्ध करून दिली आहे. त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असून देशाच्या विकासाला हातभार लागत आहे, असे सांगून जावडेकर म्हणाले, शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा न घेण्याच्या धोरणामुळे त्यांना शिकविण्यात आलेल्या गोष्टींपैकी काय समजले आहे, हेच समजत नव्हते. त्यासाठीच पाचवी, आठवीच्या परीक्षा पुन्हा सुरू केल्या आहेत. शिक्षणतज्ज्ञांवर सरकारचा विश्वास आहे. शासकीय अधिकाऱ्यांची बदली होत असते. त्यामुळे त्यांनी शिक्षणतज्ज्ञांचे अधिकारी होण्यापेक्षा शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनाच हे अधिकार देण्यात येणार आहेत. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'वरील (आयआयएम) सरकारी नियंत्रण पूर्णपणे काढून ते अधिकार 'आयआयएम'च्या माजी विद्यार्थ्यांना दिले आहेत.




गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्थेच्या २४ व्या पदवीप्रदान कार्यक्रमात प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते सोमवारी विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. डॉ. राजीव कुमार आणि डॉ. राजस परचुरे या वेळी उपस्थित होते.

### कालसुसंगत संशोधन व्हावे

देशामधील घडामोडींवरील कालसुसंगत संशोधन करण्याची आवश्यकता आहे, अशी अपेक्षा प्रकाश जावडेकर यांनी व्यक्त केली. मात्र, आपल्या शिक्षण संस्था परकीय शिक्षण पद्धतीनुसार संशोधन करत आहेत. नोटाबंदी, डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, मुद्रा योजना, अटल टिंकरिंग लॅब, स्वच्छतागृहांची योजना अशा गोष्टींचा जनमानसावर मोठा प्रभाव पडत आहे. त्यावर आधारित संशोधनाची आवश्यकता असून विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांनी त्यावर भर द्यायला हवा, असे प्रकाश जावडेकर यांनी सांगितले.


